| वर्ष - 7 | अंक - 306 | UDYAM-MH-26-0158827 |

# महाईन्यूज™

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

www.mahaenews.com | सोमवार, दिनांक 25 मार्च 2024 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

**उद्या अंक नाही**

सोमवार, दिनांक 25 मार्च रोजी धुलीवंदनानिमित्त महाईन्यूजच्या कार्यालयास सुटी असल्यामुळे मंगळवार, दिनांक 26 मार्च रोजीचा अंक प्रकाशित होणार नाही. याची आमचे वाचक, जाहिरातदार, हितचिंतक यांनी नोंद घ्यावी.

-संपादक

धुलीवंदनाच्या हार्दिक शुभेच्छा

## खासदार बारणेंच्या हाती 'कमळ'?

# मावळात शिवसेना 'डेंजर झोन'मध्ये!

### महायुतीमध्ये अंतर्गत धूसफूस : कथित सर्वेक्षणात सेनेला पसंती कमी

| पिंपरी | महाईन्यूज

**मावळ लोकसभा मतदारसंघात खासदार श्रीरंग बारणे शिवसेनेच्या उमेदवारीच्या मुद्यावरून 'डेंजर झोन'मध्ये असल्याचे सर्वेक्षण अहवालावरून समजते. त्यामुळे बारणे यांनी भारतीय जनता पक्षाच्या कमळ चिन्हावरून निवडणूक लढवावी, असा आग्रह धरला जात आहे. मावळमध्ये महाआघाडीकडून संजोग वाघेरे-पाटील यांच्या उमेदवारीची औपचारिक घोषणा शिल्लक आहे. त्यामुळे त्यांनी प्रचाराला सुरुवात केली आहे. दुसरीकडे, महायुतीच्या गटात तूर्तास अंतर्गत घडामोडी चालू आहेत. उमेदवार जाहीर होत नसल्यामुळे वेगवेगळे तर्कवितर्क लढविले जात आहेत.**




महायुतीच्या उमेदवारीबाबत वेगवेगळ्या यंत्रणांच्या सर्वेक्षण अहवालाचा आधार घेतला जात आहे. मतदारसंघात समाविष्ट असणारी पिंपरी-चिंचवड आणि पनवेल महापालिका भारतीय जनता पक्षाच्या ताब्यात आहे. याशिवाय विधानसभेचे दोन आमदार, विधान परिषदेच्या एक आमदार भाजपच्या आहेत. एका अपक्ष आमदाराने भाजपला पाठिंबा दर्शविला आहे. याशिवाय नगरपालिका, पंचायत समित्यांवर भाजपचे बऱ्यापैकी वर्चस्व आहे. या परिस्थितीत महायुतीच्या उमेदवाराने भाजपच्या कमळ चिन्हावर निवडणूक लढवावी, असा आग्रह धरला जात आहे. नसेल तर माजी मंत्री बाळा भेगडे, पक्षाचे पिंपरी-चिंचवड शहराध्यक्ष शंकर जगताप यांच्या नावाचा विचार व्हावा, अशी मागणी होत आहे.

गेल्या तीन निवडणुकांमध्ये शिवसेनेने बाजी मारली आहे. ही वस्तुस्थिती असली तरी सद्यःस्थितीत शिवसेनेत फूट पडली आहे. भाजप, राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) यांच्यानंतर शिवसेनेचे (शिंदे गट) नाव घेतले जात आहे. बदलत्या राजकीय परिस्थितीत शिंदे गटाकडे प्रचार करणाऱ्या कार्यकर्त्यांचा पुरेसा संच नाही. मजबूत संघटन नाही. त्यामुळे ही जागा भाजपला मिळावी किंवा बारणे यांनी कमळ चिन्हावर निवडणूक लढवावी, असा आग्रह धरला जात आहे. त्याबाबत पक्षश्रेष्ठींनाही अवगत करण्यात आले आहे.

## बारणेंची भूमिका अद्याप गुलदस्त्यात...

» घाटाखालील पनवेल, कर्जत आणि उरण विधानसभा मतदारसंघांत अजूनही शेतकरी कामगार पक्षाला मानणारा वर्ग आहे. त्यांची हक्काची मते असल्याचा दावा केला जात आहे. त्यामुळे या पक्षाला विश्वासात घेण्यासाठी महायुती आणि महाआघाडीकडून जोरदार प्रयत्न चालू आहेत. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना तिसऱ्यांदा पंतप्रधान करण्यासाठी भाजपला पक्षाचाच खासदार निवडून आणणे हिताचे असल्याचे पक्षाच्या स्थानिक पदाधिकाऱ्यांनी म्हटले आहे.

» त्यामुळे बारणे शिवसेनेच्या उमेदवारीसाठी तूर्तास 'डेंजर झोन'मध्ये असून, प्रसंगी त्यांनी भाजपमध्ये प्रवेश करावा, असा एका गटाचा आग्रह आहे. मात्र, त्या संदर्भात तूर्तास अंतिम निर्णय झालेला नाही. त्यामुळे बारणे शिवसेनेच्या तिकिटावर निवडणूक लढणार, की भाजपच्या तिकिटावर लढणार, हे स्पष्ट झालेले नाही.

## आमदार शेळकेंच्या नावाचीही चर्चा...

» मतदारसंघात राष्ट्रवादी काँग्रेसचेही काही भागात प्राबल्य आहे. मावळ आणि पिंपरी मतदारसंघात याच पक्षाचे आमदार आहेत. शिवाय गेल्या निवडणुकीत पक्षाचे उमेदवार पार्थ पवार यांना पाच लाखांहून अधिक मते मिळाली आहेत. त्यामुळे या पक्षानेही महायुतीकडून उमेदवारीसाठी दावा केला आहे. आमदार सुनील शेळके यांच्या नावाची चर्चा आहे.



# मोहोळ यांची तुलनाच होऊ शकत नाही!

## » मोहोळ हे रस्त्यावर कधीही न फिरलेले नेते : रवींद्र धंगेकर

। पुणे । महाईन्यूज ।
प्रतिनिधी।

**दिवंगत खासदार गिरीश बापट लोकनेते होते. ते सर्वसमावेशक नेते होते. त्यांचे सर्व पक्षातील नेत्यांशी, कार्यकर्त्यांशी चांगले सबंध होते. ते मोठ्या उंचीचे नेते होते. त्यामुळे त्यांची आणि मोहोळ यांची तुलना होऊ शकत नाही. मोहोळ हे रस्त्यावर कधीही न फिरलेले नेते आहेत, बापट यांचे कार्यालय कोणी फोडले, हे पुणेकर अद्याप विसरलेले नाहीत, अशा शब्दांत आमदार आणि लोकसभा निवडणुकीसाठी काँग्रेसचे उमेदवार रवींद्र धंगेकर यांनी टीका केली.**



लोकसभा मतदारसंघासाठी उमेदवारी जाहीर झाल्यानंतर रवींद्र धंगेकर यांनी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांची मोदीबाग निवासस्थानी रविवारी भेट घेतली. शरद पवार यांनी धंगेकर यांना विजयासाठी शुभेच्छा दिल्या. काँग्रेसचे नेते मोहन जोशी, राष्ट्रवादीचे शहराध्यक्ष प्रशांत जगताप यांच्यासह महाविकास आघाडीचे पदाधिकारी आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर शरद पवार यांनी विविध विषयांवर पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांना मार्गदर्शन केले. शरद पवार हे सहाही मतदारसंघात प्रचार करणार आहेत. धंगेकर म्हणाले, या भेटीदरम्यान पवार यांनी मला विजयासाठी शुभेच्छा दिल्या. नेहमीप्रमाणेच आजचीही भेट अतिशय ऊर्जादायी होती. लोकशाहीचा आवाज बुलंद करण्यासाठी, दडपशाही रोखण्यासाठी महाविकास आघाडी आणि देशात इंडिया आघाडीला जनता भरभरून आशीर्वाद देईल, असा विश्वास आहे.मोहोळ यांनी प्रचारासाठी पहिलवान आणले आहेत, या प्रश्नावर बोलताना रवींद्र धंगेकर म्हणाले, त्यांच्याकडे पहिलवान असले तर आमच्याकडे 'वस्ताद' आहेत. वास्तविक, पहिलवान हे सर्वसामान्य कुटुंबातील असतात. त्यामुळे ते मोहोळ यांना मदत करणार नाहीत. आम्ही सर्वसामान्य कुटुंबातील असल्याने ते आम्हालाच मदत करतील. मोहोळ यांनी आजवर पहिलवानांना अर्धा लिटर दूध कधी दिले नाही; त्यांनी केवळ बांधकाम व्यावसायिकांना दूध पाजले आहे.काँग्रेसचे माजी उपमहापौर आबा बागुल यांच्या नाराजीवरही रवींद्र धंगेकर यांनी भाष्य केले. बागुल पक्षाचे ज्येष्ठ नेते आहेत. त्यांना अनेक वर्षांचा राजकारणाचा, समाजकारणाचा अनुभव आहे. ते अत्यंत गोड, मृदू स्वभावाचे नेते आहे. पक्षाचे वरिष्ठ नेते, आम्ही सर्वजणांकडून त्यांची नाराजी दूर करण्यात येईल. काँग्रेसकडे २० जणांनी उमेदवारी मागितली होती. त्यातून एकाची निवड दिल्लीतून झाली आहे. ही केवळ निवडणूक नाही; लोकशाही जिवंत ठेवण्यासाठी सुरू असलेली लढाई आहे. त्यामुळे बागूल आणि सर्वच नेते आपापल्या भागात, शहरात मेहनत घेऊन मोठे मताधिक्य काँग्रेसकडे खेचून आणतील, असा विश्वास आहे, असे धंगेकर यांनी सांगितले.लोकसभा मतदारसंघासाठी उमेदवारी जाहीर झाल्यानंतर रवींद्र धंगेकर यांनी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांची मोदीबाग निवासस्थानी रविवारी भेट घेतली.मोहोळ हे रस्त्यावर कधीही न फिरलेले नेते आहेत, बापट यांचे कार्यालय कोणी फोडले, हे पुणेकर अद्याप विसरलेले नाहीत, अशा शब्दांत आमदार आणि लोकसभा निवडणुकीसाठी काँग्रेसचे उमेदवार रवींद्र धंगेकर यांनी टीका केली.

### तर आमच्याकडे 'वस्ताद' आहेत

» लोकसभा मतदारसंघासाठी उमेदवारी जाहीर झाल्यानंतर रवींद्र धंगेकर यांनी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांची मोदीबाग निवासस्थानी रविवारी भेट घेतली. शरद पवार यांनी धंगेकर यांना विजयासाठी शुभेच्छा दिल्या. काँग्रेसचे नेते मोहन जोशी, राष्ट्रवादीचे शहराध्यक्ष प्रशांत जगताप यांच्यासह महाविकास आघाडीचे पदाधिकारी आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. शरद पवार हे सहाही मतदारसंघात प्रचार करणार आहेत.धंगेकर म्हणाले, या भेटीदरम्यान पवार यांनी मला विजयासाठी शुभेच्छा दिल्या. नेहमीप्रमाणेच आजचीही भेट अतिशय ऊर्जादायी होती. लोकशाहीचा आवाज बुलंद करण्यासाठी, दडपशाही रोखण्यासाठी महाविकास आघाडी आणि देशात इंडिया आघाडीला जनता भरभरून आशीर्वाद देईल, असा विश्वास आहे.मोहोळ यांनी प्रचारासाठी पहिलवान आणले आहेत, या प्रश्नावर बोलताना रवींद्र धंगेकर म्हणाले. त्यांच्याकडे पहिलवान असले तर आमच्याकडे 'वस्ताद' आहेत.

# मावळ मतदारसंघात उमेदवारीचा तिढा वाढला

## » खा. श्रीरंग बारणे यांची उमेदवारी मंगळवारी जाहीर होण्याची शक्यता

।पुणे ।महाईन्यूज ।
प्रतिनिधी।

**मावळ लोकसभा मतदारसंघात महायुतीमध्ये उमेदवारीचा तिढा वाढला आहे. शिवसेनेचे विद्यमान खासदार श्रीरंग बारणे यांची उमेदवारी मंगळवारी जाहीर होण्याची शक्यता वर्तविण्यात येत असताना इच्छुकांची गर्दी वाढली आहे.**




भाजपचे पिंपरी-चिंचवडचे शहराध्यक्ष शंकर जगताप, राष्ट्रवादीचे माजी नगरसेवक भाऊसाहेब भोईर, श्री संत तुकाराम सहकारी साखर कारखान्याचे उपाध्यक्ष बापूसाहेब भेगडे हेदेखील उमेदवारी मिळण्यासाठी आग्रही असल्याने महायुतीमध्ये तेढ निर्माण झाला आहे.या मतदारसंघावर मागील तीन निवडणुकांमध्ये शिवसेनेचे वर्चस्व राहिले आहे. एकदा दिवंगत खासदार गजानन बाबर आणि सलग दोन वेळा श्रीरंग बारणे खासदार आहेत. आता शिवसेना दुभंगली असल्याने शिवसेनेच्या जागेवर महायुतीतील मित्रपक्ष भाजप आणि राष्ट्रवादी काँग्रेसने दावा केला आहे. भाजपचे माजी राज्यमंत्री बाळा भेगडे, पिंपरी-चिंचवडचे शहराध्यक्ष शंकर जगताप, राष्ट्रवादीचे माजी नगरसेवक भाऊसाहेब भोईर, श्री संत तुकाराम सहकारी साखर कारखान्याचे उपाध्यक्ष बापूसाहेब भेगडे हे इच्छुक आहेत. इच्छुक वाढल्याने महायुतीत तिढा वाढल्याचे दिसते. परंतु, महायुतीची उमेदवारी मलाच मिळणार असा ठाम विश्वास शिवसेनेचे विद्यमान खासदार श्रीरंग बारणे व्यक्त करत आहेत. खासदार बारणे यांची उमेदवारी मंगळवारी जाहीर होईल असे त्यांच्या निकटवर्तीयांकडून सांगितले गेले. त्यात पुणे जिल्ह्यातील पिंपरी, चिंचवड, मावळ विधानसभा आणि रायगड जिल्ह्यातील पनवेल, कर्जत, उरण या तीन विधानसभा मतदारसंघांचा समावेश करत मावळ लोकसभा मतदारसंघ निर्माण झाला. भौगोलिकदृष्ट्या मतदारसंघ मोठा आहे.

### घाटावर ठाकरे गटाचा प्रचार सुरू

» उद्धव ठाकरे यांनी पिंपरी-चिंचवडचे माजी महापौर संजोग वाघेरे यांची उमेदवारी १५ दिवसांपूर्वीच जाहीर केली. त्यामुळे वाघेरे यांनी प्रचाराचा प्रारंभ करत मतदारसंघ पिंजून काढण्यास सुरुवात केली आहे. गाठीभेटी, बैठकांचा धडाका लावल्याचे दिसते. उद्धव ठाकरे यांनी रायगड जिल्ह्यात वाघेरे यांच्यासाठी प्रचार सभा घेतल्या आहेत. ठाकरे गटाचे संपर्कप्रमुख, आमदार सचिन अहिर यांनी प्रचाराची धुरा हाती घेतली आहे. घाटाखाली आणि घाटावर ठाकरे गटाचा प्रचार सुरू आहे.

# शहरात 66 ठिकाणी प्रचाराच्या तोफा!

## लोकसभा निवडणूक : क्षेत्रीय कार्यालयांकडे अर्ज करण्याचे आवाहन

। पिंपरी ।महाईन्यूज । प्रतिनिधी।

**लोकसभा निवडणुकीसाठी जाहीर सभा व कोपरा सभा घेण्याकरिता पिंपरी-चिंचवड शहरातील ६६ ठिकाणे निश्चित करण्यात आली आहेत. त्याशिवाय इतर ठिकाणी राजकीय पक्षांना सभा घेता येणार नाहीत. निश्चित केलेल्या जागेवर सभा घेण्यासाठी पक्षांना किंवा उमेदवारांना क्षेत्रीय कार्यालयांकडे अर्ज करावा लागणार आहे.**



पिंपरी-चिंचवड शहरात मावळ, शिरूर आणि बारामती लोकसभा मतदारसंघाचा भाग येतो. या तिन्ही मतदारसंघातील उमेदवारांचा प्रचार करण्यासाठी जाहीर सभा व कोपरा सभा घेण्यासाठी महापालिकेने मैदान व मोकळ्या जागा निश्चित केल्या आहेत. त्या जागेत सभा घेता येणार आहेत. त्यासाठी महापालिकेच्या क्षेत्रीय कार्यालयाकडे अर्ज करावा लागणार आहे. पिंपरीतील डॉ. आंबेडकर पुतळ्यामागील मोकळी जागा, आकुर्डीतील खंडोबा मंदिराशेजारील जागा, प्राधिकरणातील संजय काळे क्रीडांगण, नियोजित महापौर निवासस्थानाची मोकळी जागा, मदनलाल धिंग्रा मैदान, शाहूनगर येथील राजर्षी शाहू महाराज मैदान अशी ठिकाणे आहेत.

मोरया गोसावी मंदिराशेजारील मैदान यासह भोसरीतील पीएमटी चौक, अंकुशराव लांडगे नाट्यगृहाजवळील चौक, चऱ्होली बैलगाडा घाट, मोशीतील शिवाजी महाराज पुतळा चौक, दिघी जुना जकातनाका चौक, डुडुळगाव, बोपखेल गावठाण, भोसरीतील तळ्याजवळील मैदान, पिंपळे गुरव




### ‘फ’ क्षेत्रीय कार्यालयाच्या हद्दीत एकच ठिकाण..

कासारवाडीतील ‘ह’ क्षेत्रीय कार्यालयातील चार, निगडीतील ‘फ’ क्षेत्रीय कार्यालयाच्या हद्दीतील म्हेत्रे मैदान हे एकमेव ठिकाण आहे. ‘ब’ क्षेत्रीय कार्यालय हद्दीतील दोन तर राजकीय पक्षांना सभा घेण्यासाठी ‘क’ क्षेत्रीय कार्यालय हद्दीत सर्वाधिक ३४ अशी ६६ ठिकाणे निश्चित करण्यात आली आहेत. सभांसाठी ६६ ठिकाणे निश्चित केली आहेत. या बाबतची माहिती जिल्हाधिकारी कार्यालयाला देण्यात आली असल्याचे निवडणूक विभागाचे सहायक आयुक्त अविनाश शिंदे यांनी सांगितले.

# शहरात भाजपाचे ‘समृध्द लाभार्थी’ अभियान!

## अमित गोरखे : देशाला बलशाली बनवण्यासाठी मोदींना साथ द्या

। पिंपरी। प्रतिनिधी : महाईन्यूज

**पिंपरीपिंपरी विधानसभा मतदारसंघात समृद्ध लाभार्थी अभियानाची शनिवारी (दि. 23) कासारवाडी येथून सुरुवात झाली. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या दहा वर्षाच्या कार्यकाळात गोरगरिबांपर्यंत सरकारी योजनेचा लाभ मिळालेल्या लाभार्थ्यांपर्यंत पोहोचणे हा या अभियानाचा मुख्य उद्देश आहे.**



या अभियानात पिंपरी विधानसभेतील पदाधिकारी, कार्यकर्ते सामिल झाले होते. यावेळी पिंपरी चिंचवड भाजपा महिला मोर्चा अध्यक्ष सुजाता पालांडे, प्रदेश सदस्य माऊली थोरात, मंडल अध्यक्ष निलेश अष्टेकर, देवदत्त लांडे, प्रकाश जवळकर, सुनील लांडगे, सुरेश गदिया, गणेश संभेराव, अजित भालेराव, बापूसाहेब भोसले, राजू गणपती साठे, नाना कांबळे, बाळासाहेब लांडे, युवराज लांडे, मयूर थोरात, मनोज बोरसे, सीमा बोरसे, सार्थ पालांडे, श्रीकांत खाडे आदी उपस्थित होते. हे अभियान संपूर्ण देशभर 23 मार्च ते 1 एप्रिल पर्यंत आसणार आहे.

अमित गोरखे बोलताना म्हणाले की, मागील दहा वर्षाच्या कार्यकाळात देशात मोठ बदल घडून आले. तसेच देशातील नागरिकांना सरकारच्या माध्यमातून वेगवेगळ्या योजनेचा लाभ मिळावा त्यासाठी नवनवीन योजना आणल्या. यावेळी पिंपरी विधानसभा निवडणुक प्रमुख अमित गोरखे यांनी लाभार्थ्यांशी थेट संवाद साधला. त्यांचे मोदी यांच्या बद्दलचे मत जाणून घेतले. या देशाला बलशाली भारत बनवायचा आसेल तर फक्त मोदी हेच करु शकतात, असा आत्मविश्वास तेथील नागरिकांनी दर्शवला.

गोरखे पुढे म्हणाले, अगदी भाजी विक्रेत्या पासून ते किराणा मालाच्या दुकानापर्यंत अगदी बांगडी भरणाऱ्या महिलेने देखील मोदींमुळे काय फायदा झाला हे सांगितले. कोरोना काळात मिळालेली मोफत लस, मोफत अन्नधान्य पुरवठा, बाळंतपणात मिळालेला निधी, अपंगांना मिळालेला निधी, रोजगारासाठी मुद्रा योजनेतून घेतलेले कर्ज असे अनेक लाभार्थी या भागात संपर्क करताना भेटले. प्रत्येकाने कुठल्या ना कुठल्या शासनाच्या योजनेचा लाभ घेतल्यामुळे पुन्हा एकदा पंतप्रधान मोदी हेच आम्हाला हवे आहेत अशी उस्फूर्त भावना व्यक्त केली. कोरोनाच्या काळात वंदे भारत मिशन अंतर्गत 2.97 कोटी लोकांना देशाच्या विविध भागात आपल्या घरी सुरक्षित रित्या पोहोचवले. यासारख्या अनेक गोष्टी मोदी यांनी त्यांच्या दहा वर्षाच्या पंतप्रधान कार्यकाळात देशवासियांपर्यंत पोहोचवल्या. गेल्या दहा वर्षात देशाचा सर्वांगीण विकास होत आहे.

### वंचित घटकांपर्यंत मोदींच्या योजना...

पिंपरी विधानसभा क्षेत्रात सर्व पदाधिकारी कार्यकर्ते व नगरसेवकांबरोबर लाभार्थी संपर्क अभियानात फिरत असताना खऱ्या अर्थाने अगदी वंचित घटकांपर्यंत मोदीजींनी आखलेल्या योजना पोचल्याचा आनंद व समाधान व्यक्त झाले. प्रधानमंत्री गरीब कल्याण अन्न योजनेअंतर्गत 80 कोटीहून अधिक नागरिकांना मोफत अन्नधान्य वितरण करण्यात आले. प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत 4 कोटीहून अधिक गरिबांना कायमस्वरूपी घरे मिळाली. जल जीवन मिशन अंतर्गत 14 कोटीहून अधिक घरांमध्ये नळाचे पाणी आणि 100 टक्के घरांमध्ये वीज पोहोचली. प्रधानमंत्री स्व निधी योजनेअंतर्गत 53 लाख फेरीवाले, विक्रेत्यांना कर्ज वाटप करण्यात आले. 51 कोटीहून अधिक जन धन खाती उघडून गरिबांना बँकिंग व्यवहार प्रवाहात आणले गेले.

# गाण्यांतून प्रश्न विचारत राहणार




**नेहा राठोड ही भोजपुरीतील तरुण लोककलाकार. गेली चार वर्षे बिहार आणि उत्तर प्रदेशात ती गाजतेय ते तिच्या सडेतोड गाण्यांमुळे. 'बिहार में का बा' आणि नंतर 'यूपी में का बा' ही तिची गाणी सर्वदूर गाजली. सामान्य माणसांचे प्रश्न आपल्या गाण्यांच्या केंद्रस्थानी आणून सत्ताधाऱ्यांना ती सवाल करतेय. उत्तर प्रदेशातील योगी सरकारने नेहा विरोधात गुन्हा दाखल केलाय. पण न डगमगता नेहाचं 'का बा' विचारणं सुरू आहे.**

मी भोजपुरी भाषेतील लोककलाकार आहे. भोजपुरी ही माझी मातृभाषा. मात्र गेल्या काही वर्षांत असा एक समज झालाय की भोजपुरीतील गाणी म्हणजे फुहड, लेहंगा और चोली या पलीकडे काही नाही. अश्लीलता आणि महिलांवरची टिप्पणी एवढंच या गाण्यांतून मांडले जातेय. खरंतर भोजपुरी ही समृद्ध भाषा आहे. या भाषेतील अनेक साहित्य प्रकार प्रसिद्ध आहेत. याच भाषेतून आता सत्य आणि विचारही मांडायला हवेत असा मी विचार केला. शिक्षण, रोजगार, महागाई यावरही गाण्यांच्या माध्यमातून बोललं पाहिजे हे ठरवून मग मी सक्रिय झाले.बिहार विधानसभेची निवडणूक असताना मी 'बिहार में का बा' हे गाणं लिहिलं. ते लोकांच्या पसंतीस उतरलं. मग उत्तर प्रदेशची निवडणूक आली. तेव्हा मी काही तसं ठरवलं नव्हतं. माझा नवरा हिमांशु मला म्हणाला की तू आता 'यूपी में का बा' हे पण लिही. मग मी तेही लिहिलं आणि काही प्रश्न उपस्थित केले. ते तुफान गाजलं. पण त्यामुळे राजकारण्यांचा रोष मात्र आम्हाला पत्करावा लागला. मला वाटतं की लोकांनी सजग व्हावं, विचार करावा. सरकारला प्रश्न विचारावेत. कलाकार म्हणून संवेदनशीलपणे समाजाकडे पाहाणं हे माझं काम आहे. विरोधी पक्षांनी किंवा प्रसिद्धी माध्यमांनी याबाबत प्रश्न उपस्थित करायलाच पाहिजेत. सरकारला जाब विचारला पाहिजे. साहित्यिक, कलावंतांनीही ते केलं पाहिजे. मी हे माझं कर्तव्य समजते. समोर इतक्या सगळ्या चुकीच्या, अन्यायकारक गोष्टी घडत असताना आपण गप्प कसं बसायचं? मी माझ्या माध्यमांतून त्यावर व्यक्त होतेय. यातूनच मी 'यूपी में का बा' चा सिझन टू काढला..हो, ते होणारच होतं. मी झन्डू बाम, चोली-लहंगा गाणारी कलाकार नाही. तशा पद्धतीच्या कलाकारांना सत्तेत स्थान मान मिळतो. मला तर त्रास होणारच ना? मी सामान्य कलाकार आहे. सर्वसामान्यांशी माझी बांधिलकी आहे. भोजपुरी भाषेवर माझं मनापासून प्रेम आहे, या भाषेतूनच सत्य मांडण्याचा माझा प्रयत्न आहे. हो, हीच आमचीही खंत आहे.



युटयूब चॅनेल्समधून जो प्रचार होतोय तोच या भाषेला मारक आहे. या भाषेतील सभ्यता जणू लोप पावलीय. भोजपुरीत जी अश्लील गाणी गायली जातात, ती लाखो लोक पाहतात. त्यामुळे अधिकाधिक अश्लील कोण गातो यातच स्पर्धा सुरू आहे. एक प्रसंग सांगते. एकदा मी दिल्लीत एका कॅफेमध्ये बसले होते. तिथे पंजाबी आणि इतर गाणी वाजत होती. मी म्हटलं भोजपुरी गाणी लावाल का? तर ते रागाने म्हणाले इथे ते अलाऊड नाही. ती घाणेरडी गाणी आम्ही वाजवत नाही. तथाकथित भोजपुरी गायकांनी आमच्या भाषेची अशी वाताहत केली आहे. उत्तर प्रदेश, बिहारमध्ये बेरोजगारी एवढी आहे की यातच पैसा मिळू शकतो असं अनेकांना वाटतंय. या सगळ्याला प्रेरणा कोण देतंय? अशी अश्लील गाणी सादर करणारेच सरकारमध्ये बसलेत, खासदार झालेत. दोष कुणाला द्यायचा?होय! भाषेवर बलात्कार करणारे हे लोक भाजपचे खासदार आहेत, हे मी जाहीरपणे बोलते. रवी किशन काय गातो? तोहार लहेंगा उठा देब रिमोट से.. हा भाषेवरचा बलात्कार नाही का? हे खासदार महोदय काय गातात? चाचा हमार विधायक होवान नाही डराई हो, ये डबल चोटीवाली तोहके टांग ले जाई हो.. म्हणजे काय तर मेरे चाचा विधायक है, मैं डरता नही हूं, ए डबल चोटीवाली लडकी तुझे टांग कर ले जाऊंगा.. ही अशी गाणी? रवी किशनची ही काय भाषा आहे? याच्यावर काय बोलणार? खासदार मनोज तिवारीची गाणी ऐका. तो काय गाणी गातो – फटाफट खोल के दिखाव.. लोकांना याची मजा वाटते? महिलांबाबत यांचा हा दृष्टिकोन? बहुनी के लागल बा सहर की हवा, औढी पढावा.. कहनी के गऊनी में नऊवा लिखावा, औरी पढावा.. म्हणजे मुलीला शिकवलं तर तिला शहराची हवा लागेल. तेव्हा तिला शिकायला गावाबाहेर पाठवू नका. तिचं लग्न करून टाका.. मला तिरस्कार वाटतो अशा खासदार गायकांचा. ही गाणी हा भाजपचा महिला विकास आहे का?

## संपादकीय »

### 'गॅरंटी'ची हमी!

***जवळजवळ प्रत्येक निवडणुकीतील जाहीरनामे पाहिले, की आपले राजकीय पक्ष 'मायबाप सरकार' ही संकल्पना किती घट्ट करीत चालले आहेत, याची कल्पना येते.***

जवळजवळ प्रत्येक निवडणुकीतील जाहीरनामे पाहिले, की आपले राजकीय पक्ष 'मायबाप सरकार' ही संकल्पना किती घट्ट करीत चालले आहेत, याची कल्पना येते. जागतिकीकरणाचे धोरण स्वीकारून तीन दशके उलटून गेल्यानंतरही अंशदाने, सवलती, थेट आर्थिक लाभ आणि कर्जमाफी यांचीच आश्वासने दिली जात असतील, तर देशाची प्रगती झाली म्हणजे नेमके काय झाले, असा प्रश्न नक्कीच मनात येतो. संधीची समानता, निकोप वातावरण आणि विकासप्रक्रियेला स्वयंगती मिळवून देणे यात सरकारची कसोटी असते. त्यासाठी धोरणात्मक चौकट आखणे महत्त्वाचे. यंदा जाहीरनाम्याचा मसुदा आधी प्रसिद्ध करून काँग्रेस पक्षाने वेळेच्या बाबतीत आघाडी घेतली आहे खरी; पण नेत्याचा चेहरा आणि त्याचा करिष्मा बघूनच मतदानास जाणारा 'मतदार राजा' एकूणातच राजकीय पक्षांच्या या लिखित जाहीरनाम्यांना कितपत महत्त्व देतो, हा प्रश्नच आहे.

आपल्याला असे वाटत होते की फक्त वर्णमालेचाच खेळखंडोबा असणार आहे. उदाहरणार्थ आयटी, सीबीआय, ईडी, एसएफआयओ, एनसीबी, एनआयए.. आणि बाकीचे सगळे नेहमीसारखे असतील. 'बिग ब्रदर' कोण आहे? अचानक मोठा झालेला कोण आहे ? लुडबुड करणारा कोण आहे? कोण जास्त शक्तिशाली आहे?

# थोडे थांबा..'अच्छे दिन' येतच आहेत..!

या शक्तिशालीचा आवडता कोण आहे ? हे असे प्रश्न आहेत जे दोन लोक चहा/कॉफी प्यायला किंवा गप्पा मारायला भेटतात तेव्हा एकमेकांना विचारतात. पण तीन किंवा त्यापेक्षा जास्त लोक असतात, तेव्हा सगळे जण चिडिचूप होतात. हे सगळे प्रश्न सोडवण्यासाठी, मी असे सुचवेन की प्रत्येक मतदान केंद्रावर ईव्हीएम लावा. सगळ्या उमेदवारांच्या पक्षांची यादी करा आणि लोकांना त्यांच्या पसंतीच्या पक्षाला मतदान करायला सांगा. ८५ वर्षांपेक्षा जास्त वयाच्या व्यक्तींना त्यांच्या घरून मतदान करू द्या. 'नोटा'चा पर्याय देऊच नका.या खेळखंडोब्यातील नवीन खेळ म्हणजे सीएए-एनआरसी. (एनआरसीचा उद्देश सर्व नागरिकांची राष्ट्रीय नोंदणी करणे होता. त्यासाठी एक अत्यंत क्रूर प्रक्रिया अवलंबली गेली. देशभक्त लेखकांना असे आढळून आले की लाखो हिंदूंची प्रगणना नाकारली गेली आहे, तेव्हा त्यांनी सीएए शोधून काढले. त्यामुळे आता अफगाणिस्तान, बांगलादेश आणि पाकिस्तानमधील



मुस्लीम वगळता उर्वरित सर्वांना नागरिकत्व दिले जाईल आणि परिणामी, एनआरसीमध्ये त्यांचे गणन केले जाईल. या प्रक्रियेत, श्रीलंकेतील तमिळ तसेच नेपाळ आणि म्यानमारमधील भारतीय वंशाच्या लोकांचा, त्यांच्या हितसंबंधांचा विश्वासघात केला गेला.) एनआरसी फक्त आसाममध्ये उपलब्ध आहे. ११ मार्च २०२४ रोजी सीएएचा समावेश करण्यात आला. एनआरसी-सीएएची सध्या उच्च न्यायालयामध्ये सुनावणी सुरू आहे. उशिराने का होईना आपल्यालाही समजले आहे की आपणदेखील संख्यात्मक खेळखंडोब्यामध्ये आहोत. एकेकाळी बोर्डाच्या परीक्षेत प्रत्येकाची ओळख फक्त क्रमांकाने होती. त्यानंतरच्या नजिकच्या काळात आणखी काही क्रमांकांनी आपल्या जीवनात प्रवेश केला. रेशनकार्ड क्रमांक, मतदार ओळखपत्र क्रमांक, दुचाकी किंवा कार नोंदणी क्रमांक, लँडलाइन टेलिफोन क्रमांक, अधिक साहसी व्यक्तींसाठी पासपोर्ट क्रमांक, सर्वव्यापी मोबाइल क्रमांक आणि सर्वव्यापी आणि सर्वशक्तिमान ईश्वरासारखा असलेला आधार क्रमांक. आता, इतर सर्व आकड्यांवर मात करण्यासाठी एक नंबर आला आहे – तो म्हणजे निवडणूक रोख्यांचा (इलेक्टोरल बाँड-ईबी) अल्फान्यूमेरिक नंबर. भारताचे सर्वशक्तिमान सर्वोच्च न्यायालयदेखील घाबरलेल्या स्टेट बँकेच्या पकडीतून अल्फान्यूमेरिक क्रमांक सहजी घेऊ शकले नाही. काही दिवसांसाठी, ईबी-एसबीआय हे ईडी-सीबीआयपेक्षा अधिक शक्तिशाली दिसत होते. सध्या जॉइन द अल्फाबेट्स नावाचा एक नवीन खेळ आला आहे. त्याचा पहिला विजेता होता सीबीआय-ईडी. पण त्यामुळे ईडी नाराज झाली. ईडीने ठामपणे सांगितले की ते मुख्य सूत्रधार होते.

## ।। अभंगवाणी ।।



आजिवरी तुम्हां आम्हां नेणपण ।  
कौतुकें खेळणें संग होता ॥१॥

आतां अनावर जालें अगुणाची ।  
करूं नये तें चि करीं सुखें ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी विशाल थिएटर, पिंपरीच्या बाजूला **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक : *वैष्णव जाधव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक : MH-26-0158827. (विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

# मराठा खासदार निवडून द्यावा!

## एकेका मतदार संघात जास्त फॉर्म दाखल करण्याचा निर्णय



। मुंबई । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**संघात चारशे उमेदवारी अर्ज टाकल्यास निवडणूक विचलित होईल पण आपला हेतू साध्य होणार नाही म्हणून प्रत्येक मतदार संघात सकल मराठा समाजाने एक अपक्ष उमेदवार उभा करून त्याला विजयी करून समाजाची ताकद दाखवून द्यावी असा निर्णय आज अंतरवली सराटी या गावात झालेल्या मराठा महासभेत घेण्यात आला असून मराठा समाजाने आपली राजकीय ताकद दाखवून द्यावी असे आवाहन मराठा योद्धा मनोज जरांगे पाटील यांनी केले.**

"मराठा समाज मोठ्या प्रमाणावर मोठ्या प्रमाणावर फॉर्म भरणार होता. ते अडचणीचं झालं असतं. मराठा समाजाला त्यांची शक्ति दाखवायची असेल तर उमेदवारही तुम्हीच द्या. फॉर्मही तुम्हीच ठरवा. पुढचा निर्णय ३० तारखेला जाहीर करू.

मी राजकारणात उतरणार नाही. कारण तो माझा मार्ग नाही. कुणाच्या पक्षाला निवडा किंवा भाजपाला पाडा हे काही मान्य नाही. राजकीय शक्ती दाखवायची असेल तर मतांमध्ये रुपांतर करायचं असेल तर हजार आणि दहा हजार फॉर्म भरु नका. एक उमेदवार द्या आणि त्याला निवडून आणा म्हणजे ताकद दिसेल. मी राजकारणात जाणार नाही. निवडणुकीला उभा राहणार नाही. पण मराठा व्होट बँक काय आहे ती ताकद दाखवून देणार" असं मनोज जरांगेंनी म्हटलं आहे.

"लोकसभा निवडणुकीत जास्त फॉर्म भरून आपला समाज अडचणीत येऊ शकतो. आपली उमेदवारी अर्ज सरकार रद्द करू शकतं.

जास्त उमेदवारी अर्ज दाखल झाले तर आपली मतंही फुटतील. त्यामुळे एक काम करा अपक्ष म्हणून एकच फॉर्म पूर्ण जिल्ह्यातून टाका. कोणता उमेदवार उभा करायचा तो निर्णय तुम्ही घ्या, मी सांगणार नाही. आतापर्यंत अनेक खासदार दिल्लीत गेले आहे, आपल्याला त्यांचा काही फायदा होत नाही. आपलं आरक्षण दिल्लीत नाहीच", असेही जरांगे म्हणाले आहेत. मराठा समाजाचे १७ ते १८ मतदारसंघावर वर्चस्व आहे. मराठ्यांनी निर्णय घेतला तर मुस्लीम आणि दलित आपल्या सोबत आहेत. यामुळे आपण लोकसभेत एकच उमेदवार द्या आणि अपक्ष द्या. दुसरा पर्याय म्हणजे आपण अर्ज न भरता मराठा समाजाने कोणत्याही पक्षाचा असेल त्याच्याकडून बॉण्ड लिहून घ्यायचा तू सग्या सोयऱ्यासाठी आणि मराठा आरक्षणासाठी आवाज उचलणार का..? हा प्रश्न त्या उमेदवाराला विचारला गेलाच पाहिजे असंही जरांगे म्हणाले. मराठा समाजाने कोणत्याही सभेला जायचं नाही. कोणत्याच पक्षाचा प्रचार करायचा नाही. मात्र मराठा समाजाने शंभर टक्के मतदान करायचे आहे. त्यामुळे तुमचा जर सर्वांचं मत असेल तर एक जिल्ह्यातून अपक्ष मराठा उमेदवार उभा करायचा. यासाठी गावाकडे जा, गावात सर्व मराठ्यांची बैठक घ्यावी लागणार आहे. तुम्ही जो उमेदवार उभे करणार आहे तो सर्वांना मान्य आहे का? याची चर्चा करावी. त्याचा लेखी मला पाठवा आणि आपण उमेदवारांची घोषणा करून टाकणार असल्याचे जरांगे म्हणाले. मात्र, राजकारण माझा मार्ग नसून, मला त्यात अडकवू नका असेही जरांगे म्हणाले आहेत."मराठा समाज मोठ्या प्रमाणावर मोठ्या प्रमाणावर फॉर्म भरणार होता. ते अडचणीचं झालं असतं. मराठा समाजाला त्यांची शक्ति दाखवायची असेल तर उमेदवारही तुम्हीच द्या. फॉर्मही तुम्हीच ठरवा. पुढचा निर्णय ३० तारखेला जाहीर करू.

### जरांगेंचा प्रभाव ओसरू लागला ?

करमाळ्यात जरांगे-पाटील यांनी कमी प्रतिसाद मिळालेल्या सभेत अवघ्या पाच मिनिटांत भाषण आटोपते घेतले. कारण दुसऱ्या दिवशी आंतरवली सराटीत मराठा आरक्षण प्रश्नावर मोठी बैठक असल्याने आणि त्या बैठकीत महत्वाच्या आठ-दहा मुद्यांवर भूमिका ठरणार असल्यामुळे जरांगे हे करमाळ्यातील सभेत अधिक तपशीलवार भाषण करणे शक्त नव्हते, हेही कारण दिले जात आहे. यापूर्वी गेल्या नोव्हेंबरमध्ये अगदी पहाटे चार वाजता कडाक्याच्या थंडीत जरांगे-पाटील यांची सभा याच करमाळा तालुक्यातील वांगी येथे झाली होती. तरीसुध्दा थंडी झेलत हजारोंचा जनसमुदाय उपस्थित होता. पहाटे चार वाजता कायदा धाब्यावर बसवून झालेल्या त्या सभेची पोलीस प्रशासनाने दखल न घेता फौजदारी कारवाई करण्याचे टाळले होते. त्या तुलनेत दिवे गव्हाणमध्ये झालेल्या सभेला अल्प प्रतिसाद मिळाल्यामुळे जरांगे-पाटील यांचा प्रभाव ओसरू लागल्याचेही बोलले जात आहे. आंतरवली सराटीमध्ये आगामी लोकसभा निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर मराठा आरक्षण प्रश्नी आठ-दहा मुद्यांवर भूमिका ठरविण्यासाठी महत्वाची बैठक होणार असल्यामुळे करमाळ्यातील सभेत जरांगे यांनी अधिक भाष्य करण्याचे टाळले असावे.

# सोलापुरात भाजपचे राम सातपुते उमेदवार

## प्रणिती शिंदेंचे आव्हान पेलणार ? दोन युवा आमदारांमध्ये लढत

। मुंबई । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**सोलापूर लोकसभा राखीव मतदारसंघात सत्ताधारी भाजपचा उमेदवार कोण, याची उत्सुकता अखेर संपली असून माळशिरसचे आमदार राम सातपुते यांना उमेदवारी मिळाली आहे.**

त्यांच्या रूपाने भाजपकडून काँग्रेसच्या आमदार प्रणिती शिंदे यांना तगडे आव्हान देण्यात आल्याचे स्पष्ट झाले आहे. सोलापुरात भाजपच्या उमेदवारीसाठी मोठी भाऊगर्दी झाली होती. परंतु यात अखेर आमदार राम सातपुते यांच्या गळ्यात उमेदवारीची माळ पडली आहे.अवघ्या ३४ वर्षांचे सातपुते हे संघातून तयार झालेले आणि अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेतून वाढले तरूण नेते आहेत. मूळ बीड जिल्ह्यातील डोईठाण (ता. आष्टी) येथील रहिवासी असलेले सातपुते हे अ. भा. विद्यार्थी परिषदेचे प्रदेश मंत्री आणि भारतीय जनता युवा मोर्च्याचे प्रदेश उपाध्यक्षपद सांभाळत असताना मागील २०१९ सालच्या विधानसभा निवडणुकीत





भाजपने त्यांना माळशिरस राखीव मतदारसंघातून निवडून आणण्याची जबाबदारी ज्येष्ठ नेते विजयसिंह मोहिते-पाटील यांच्यावर सोपविली होती. सोलापूर लोकसभेसाठी त्यांचेच नाव आघाडीवर होते. याशिवाय प्रसिद्ध उद्योजक तथा दलित चेंबर ऑफ कॉमर्स अँन्ड इंडस्ट्रीजचे संस्थापक-अध्यक्ष, पद्मश्री मिलिंद कांबळे यांचेही नाव संभाव्य उमेदवार म्हणून चर्चेत होते. परंतु काँग्रेसच्या उमेदवार आमदार प्रणिती शिंदे यांचे आव्हान परतवून लावण्याच्या अनुषंगाने भाजपने विचारपूर्वक आमदार राम सातपुते यांना उमेदवारी दिली आहे. त्यामुळे आता सोलापुरात आमदार प्रणिती शिंदे आणि आमदार राम सातपुते यांच्यात थेट लढत होण्याची अपेक्षा आहे. मागील २०१४ आणि २०१९ सालच्या सोलापूरच्या लोकसभा निवडणुकीत काँग्रेसचे ज्येष्ठ नेते सुशीलकुमार शिंदे यांना सलग दोनवेळा पराभव पत्करावा लागला होता. वडिलांच्या पराभवाची सल कन्या म्हणून आमदार प्रणिती शिंदे यांच्या मनात आहे.

### प्रणिती शिंदे यांना तगडे आव्हान

यंदाच्या लोकसभा लढतीत त्या आपल्या वडिलांच्या पराभवाचा वचपा काढणार की भाजपच पुन्हा विजयाची हॅट्रिक साधणार, याचे उत्तर या लढतीतून मिळणार आहे.सोलापूर लोकसभा राखीव मतदारसंघात त्यांच्या रूपाने भाजपकडून काँग्रेसच्या आमदार प्रणिती शिंदे यांना तगडे आव्हान देण्यात आल्याचे स्पष्ट झाले आहे. सोलापुरात भाजपच्या उमेदवारीसाठी मोठी भाऊगर्दी झाली होती.

# अटकेविरोधात इंडिया आघाडीची एकजूट!

## आघाडीची 31 मार्च रोजी रामलीला मैदानावर महारॅली

। नवी दिल्ली ।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

**दिल्लीतील मद्य धोरण गैरव्यवहारप्रकरणी दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांना अटक झाली आहे. कोर्टाने त्यांना २८ मार्चपर्यंत ईडी कोठडी सुनावली आहे. या निषेधार्थ इंडिया आघाडीने एकजूट दाखवली असून देशभर निदर्शने केली जात आहेत. तसंच, आता ३१ मार्च रोजी दिल्लीच्या रामलीला मैदानावर आता महारॅलीही काढण्यात येणार आहे. इंडिया आघाडीने आज रविवारी याबाबत जाहीर घोषणा केली.**




दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांना सक्तवसुली संचालनालयाने २१ मार्च रोजी दिल्लीतील सिव्हिल लाइन्स भागातील त्यांच्या अधिकृत निवासस्थानावर झडती घेतल्यानंतर मनी लॉन्ड्रिंग विरोधी कायद्यांतर्गत अटक केली होती. त्यानंतर कथित दारू घोटाळ्यातील अनियमिततेतील त्यांच्या भूमिकेबद्दल तपशीलवार आणि सतत चौकशी करण्यासाठी त्यांना २८ मार्चपर्यंत ईडीच्या कोठडीत पाठवण्यात आले.आज पत्रकार परिषदेला संबोधित करताना, इंडिया आघाडीतील आप आणि काँग्रेसने रॅलीची घोषणा केली. "लोकशाही आणि देश धोक्यात आहे. इंडिया आघाडीतील सर्व घटक पक्ष देशाचे हित आणि लोकशाहीचे रक्षण करण्यासाठी ही 'महारॅली' काढतील", असे आप नेते गोपाल राय म्हणाले. "हुकूमशाहीचा अवलंब करून देशातील लोकशाही संपवून दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांना अटक करण्यात आली आहे. संविधान आणि लोकशाहीवर प्रेम करणाऱ्या आणि आदर करणाऱ्या प्रत्येक व्यक्तीमध्ये संताप आहे. प्रत्येक विरोधी नेत्यावर खोटे गुन्हे दाखल करण्यासाठी पंतप्रधान मोदी यंत्रणांचा दुरुपयोग करत आहेत", आप नेते पुढे म्हणाले.काँग्रेसचे दिल्लीचे प्रमुख अरविंदर सिंग लवली यांनीही सांगितले की,"३१ मार्चची 'महारॅली' 'राजकीय' नसून देशाची लोकशाही वाचवण्यासाठी आणि केंद्राविरोधात आवाज उठवण्याची हाक असेल." शुक्रवारी, इंडिया आघाडीतील अनेक नेत्यांनी अरविंद केजरीवाल यांच्या अटकेबद्दल आणि लोकसभा निवडणुकीपूर्वी विरोधी नेत्यांना कथित लक्ष्य केल्याच्या विरोधात आपला निषेध नोंदवण्यासाठी निवडणूक आयोगाची भेट घेतली. "३१ मार्चला रामलीला मैदानात सकाळी १० वाजता इंडिया आघाडीकडून महारॅलीचं आयोजन करण्यात आलं आहे. या देशातील लोकशाही वाचवण्याकरता या रॅलीचं नियोजन करण्यात आलं आहे. गेल्या काही वर्षात सातत्याने लोकशाहीवर हल्ला झाला आहे. विद्यमान मुख्यमंत्र्यांना अटक केली जाते. काँग्रेसची खाती निष्क्रिय केली जातात. आता प्रश्न निर्माण होतोय की रॅलीला परवानगी मिळेल की नाही. विरोधकांना निवडणुकाच लढवू दिले जात नाहीय, त्यामुळे देशात लोकशाही कशी वाचेल?" असा प्रश्न आपच्या नेत्या आतिशी यांनी विचारला. आज पत्रकार परिषदेला संबोधित करताना, इंडिया आघाडीतील आप आणि काँग्रेसने रॅलीची घोषणा केली. "लोकशाही आणि देश धोक्यात आहे. इंडिया आघाडीतील सर्व घटक पक्ष देशाचे हित आणि लोकशाहीचे रक्षण करण्यासाठी ही 'महारॅली' काढतील", असे आप नेते गोपाल राय म्हणाले. "हुकूमशाहीचा अवलंब करून देशातील लोकशाही संपवून दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांना अटक करण्यात आली आहे. संविधान आणि लोकशाहीवर प्रेम करणाऱ्या आणि आदर करणाऱ्या प्रत्येक व्यक्तीमध्ये संताप आहे.

### लोकशाही आणि देश धोक्यात

» ल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांना सक्तवसुली संचालनालयाने २१ मार्च रोजी दिल्लीतील सिव्हिल लाइन्स भागातील त्यांच्या अधिकृत निवासस्थानावर झडती घेतल्यानंतर मनी लॉन्ड्रिंग विरोधी कायद्यांतर्गत अटक केली होती. त्यांना २८ मार्चपर्यंत ईडीच्या कोठडीत पाठवण्यात आले.आज पत्रकार परिषदेला संबोधित करताना, इंडिया आघाडीतील आप आणि काँग्रेसने रॅलीची घोषणा केली. "लोकशाही आणि देश धोक्यात आहे. इंडिया आघाडीतील सर्व घटक पक्ष देशाचे हित आणि लोकशाहीचे रक्षण करण्यासाठी ही 'महारॅली' काढतील", असे आप नेते गोपाल राय म्हणाले. "हुकूमशाहीचा अवलंब करून देशातील लोकशाही संपवून दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांना अटक करण्यात आली आहे. संविधान आणि लोकशाहीवर प्रेम करणाऱ्या आणि आदर करणाऱ्या प्रत्येक व्यक्तीमध्ये संताप आहे. प्रत्येक विरोधी नेत्यावर खोटे गुन्हे दाखल करण्यासाठी पंतप्रधान मोदी यंत्रणांचा दुरुपयोग करत आहेत", आप नेते पुढे म्हणाले. काँग्रेसचे अरविंदर सिंग लवली यांनीही सांगितले की, "३१ मार्चची 'महारॅली' 'राजकीय' नसून देशाची लोकशाही वाचवण्यासाठी आणि केंद्राविरोधात आवाज उठवण्याची हाक असेल.

# सद्गुरु यांच्या इशा फाउंडेशनमधून ६ लोक बेपत्ता


## 2016 पासून इशा फाउंडेशनमधून लोक बेपत्ता झाल्याचे आले समोर

। नवी दिल्ली ।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

**प्रसिद्ध आध्यात्मिक गुरु सद्गुरु जग्गी वासुदेव यांचा तमिळनाडूमधील कोइम्बतूर याठिकाणी इशा फाऊंडेशन नावाची संस्था आहे. या ठिकाणाहून २०१६ पासून सहा लोक बेपत्ता झाले आहेत. ते परत आले की नाही, याबाबत कोणतीही माहिती नसल्याचे पोलिसांनी मद्रास उच्च न्यायालयात सांगितले.**

न्या. एम. एस. रमेश आणि न्या. सुंदर मोहन यांच्या खंडपीठासमोर हॅबियस कॉर्पस या याचिकेवर सुनावणी झाली असताना पोलिसांनी गुरुवारी ही माहिती दिली. थिरुमलाई यांचा भाऊ गणेशनला शोधून आणण्यासाठी ही याचिका त्यांच्यावतीने दाखल करण्यात आली आहे.थिरुमलाईने न्यायालयाला सांगितले की, त्याचा भाऊ गणेशन इशा फाउंडेशनमध्ये २००७ पासून काम करत होता. मात्र मार्च २०२३ रोजी तो कोईम्बतूरच्या संस्थेतून अचानक बेपत्ता झाला. या खटल्यात तमिळनाडू पोलीस प्रतिवादी असून त्यांनी उच्च न्यायालयात दिलेल्या माहितीनुसार २०१६ पासून इशा फाऊंडेशनमधून अनेक लोक बेपत्ता झाल्याचे समोर आले आहे. अतिरिक्त सरकारी वकील ई. राज तिलक यांनी पोलिसांची



बाजू न्यायालयासमोर मांडली. ते म्हणाले की, या प्रकरणांचा तपास सुरू आहे. मात्र बेपत्ता झालेल्या काही जणांपैकी अनेक लोक परत आलेले आहेत, पण त्यांची माहिती सध्या आमच्याकडे उपलब्ध नाही. उच्च न्यायालयाने पोलिसांच्या या माहितीची दखल घेतली असून या प्रकरणाचा सखोल तपास करून १८ एप्रिलपर्यंत सविस्तर अहवाल सादर करावा, असे निर्देश दिले. थिरुमलाई यांनी उच्च न्यायालयाला सांगितले की, इशा फाऊंडेशनमधून मला कळविण्यात आले की, गणेशन दोन दिवसांपासून आढळून आलेला नाही. यानंतर ५ मार्च २०२३ रोजी इशा फाऊंडेशनच्या दिनेश राजा यांनी पोलिसांत तक्रार दाखल केली. ज्याचे रुपांतर बेपत्ता एफआयआरमध्ये करण्यात आले. थिरुमलाई यांनी हॅबियस कॉर्पस याचिका दाखल करून त्यांच्या भावाला तातडीने शोधण्याची विनंती न्यायालयाला केली. बेपत्ता झाल्याच्या तक्रारीनुसार गणेशन याने २८ फेब्रुवारी २०२३ रोजी इशा फाऊंडेशन केंद्राबाहेर पडल्याचे आढळून आले. गणेशनने पोंडी मंदिरात जाण्यासाठी रिक्षा पकडली आणि त्यानंतर तो बेपत्ता झाला. झाल्याच्या दाव्यावर बोलताना इशा फाऊंडेशनने नापसंती व्यक्त केली. ही माहिती पूर्णपणे खोटी असल्याचे निवेदन इशा फाऊंडेशनने दिले आहे.

### कोण आहे सद्गुरु जग्गी वासुदेव?

» सद्गुरु जग्गी वासुदेव यांच्यावर काही दिवसांपूर्वीच शस्त्रक्रिया करण्यात आली आहे. दिल्लीच्या अपोलो रुग्णालयात त्यांच्या मेंदूवर शस्त्रक्रिया पार पडली. शस्त्रक्रियेनंतर सद्गुरु यांचा व्हेंटिलेटर सपोर्ट काढण्यात आला असून आता त्यांची प्रकृती चांगली असल्याचे सांगितले जाते. जग्गी वासुदेव हे अध्यात्मिक गुरु, योगी, लेखक आणि कवी आहेत. तसंच गूढ लेखनाकडे त्यांचा कल आहे. जगभरात त्यांचे लाखो अनुयायी आहेत. इशा फाऊंडेशन नावाच्या संस्थेचे ते संस्थापकही आहेत. इशा फाऊंडेशन हे भारतासह संयुक्त राष्ट्र, अमेरिका, इंग्लंड, लेबनॉन, सिंगापूर आणि ऑस्ट्रेलिया या देशांमध्ये योगसाधना शिकवण्याचं काम करते.

# नेने यांनी होळीनिमित्त बनवली पुरणपोळी

माधुरी दीक्षित मराठीसह बॉलीवूड इंडस्ट्रीमध्ये नेहमीच चर्चेत असते. सध्या ती 'डान्स दिवाने' कार्यक्रमात परीक्षकाची भूमिका निभावत आहे. बॉलीवूडमध्ये आघाडीची अभिनेत्री असूनही माधुरीने आपला मराठमोळा स्वभाव कायम जपला. तिच्या याच गोष्टींचं सर्वत्र कौतुक करण्यात येतं. याशिवाय तिचे पती डॉ. श्रीराम नेने हे देखील सोशल मीडियावर सक्रिय असतात. त्यांचे रेसिपी व्हिडीओ सर्वत्र व्हायरल होतात. यापूर्वी या दोघांनी मिळून मिसळ बनवली होती. आता होळीनिमित्त डॉ. नेनेंनी खास पुरणपोळीचा बेत केला आहे. होळीच्या सणानिमित्त महाराष्ट्रातील घरोघरी पुरणाची पोळी बनवली जाते. याची खास पाककृती डॉ. श्रीराम नेने यांनी सोशल मीडियावर शेअर केली आहे. सर्वप्रथम त्यांनी पुरण वाटून घेतलं. पुढे, मऊसूत पुरणपोळी लाटून, ती तव्यावर शेकवून त्यावर तुपाची धार सोडली. त्यांची पाककला पाहून नेटकरी भारावून गेले आहेत."होळी हा महाराष्ट्रातील कौटुंबिक सण आहे. त्यामुळे महाराष्ट्रातील घरोघरी प्रेमाने बनवली जाणारी सगळ्यांची आवडती पुरणपोळी कशी करतात हे आज तुम्ही माझ्याकडून शिका" असं कॅप्शन डॉ. नेने यांनी या व्हिडीओला दिलं आहे. यामध्ये शेवटी त्यांचे आई-बाबा पुरणपोळीचा आस्वाद घेत असल्याचं पाहायला मिळत आहे. डॉ. नेने यांना एवढी वर्षे अमेरिकेत राहून महाराष्ट्रातील हा पारंपरिक पदार्थ बनवता येतोय हे पाहून चाहत्यांनी आश्चर्य व्यक्त केलं आहे. तसेच माधुरीच्या पतीवर कमेंट्स सेक्शनवर कौतुकाचा वर्षाव करण्यात येत आहे.

# टिपिकल बाई, नेटकऱ्याची मुग्धाच्या लूकवर कमेंट

गायिका मुग्धा लघाटे (MUGDHA VAISHAMPAYAN) आणि गायक प्रथमेश लघाटे (PRATHAMESH LAGHATE) यांचा लग्न सोहळा तीन महिन्यांपूर्वी धुमधडाक्यात पार पडला. मुग्धा आणि प्रथमेश यांनी त्यांच्या विवाह सोहळ्याचे फोटो सोशल मीडियावर शेअर केले. त्यांच्या फोटोवर नेटकऱ्यांनी लाइक्स आणि कमेंट्सचा वर्षाव केला. अशातच आता लग्नाला तीन महिने पूर्ण झाल्यानंतर मुग्धा आणि प्रथमेश त्यांचे काही फोटो सोशल मीडियावर शेअर केले आहेत. या फोटोला एका नेटकऱ्यानं कमेंट केली आहे. या कमेंटला प्रथमेशनं दिलेल्या रिप्लायनं अनेकांचे लक्ष वेधले आहे.प्रथमेश आणि मुग्धा यांनी त्यांचे काही फोटो सोशल मीडियावर शेअर केले आहेत. या फोटोला त्यांनी कॅप्शन दिलं, "कालच आमच्या लग्नाला 3 महिने पूर्ण झाले! याच निमित्ताने आज गोव्यातल्या केरीला जाऊन विजयादुर्गा देवीचं आणि माणगावातील श्री दत्त मंदिरात जाऊन दत्त महराजांचं, श्रीमद् परमहंस परिव्राजकाचार्य वासुदेवानंद सरस्वती टेंबे स्वामी महराजांचं दर्शन घेतलं!हेची घडो मज जन्मजन्मांतरी,मागणे श्रीहरी नाही दुजे|"मुग्धा आणि प्रथमेश यांनी शेअर केलेल्या फोटोमधील मुग्धाच्या लूकबाबत एका नेटकऱ्यानं कमेंट केली, "काकू झाली आहे, टिपिकल बाई" नेटकऱ्याच्या या कमेंटवर प्रथमेशनं रिप्लाय दिला, "आमच्या कोकणात एक म्हण आहे, माकडं म्हणतं आपलीच लाल जस्ट सांगितलं. बाकी मनात काही नाही आजी" प्रथमेशच्या या रिप्लायनं अनेकांचे लक्ष वेधले आहे.

# माझं नाव करिश्मा नाही



९० च्या दशकातील लोकप्रिय अभिनेत्री म्हणून करिश्मा कपूरला ओळखलं जातं. आजवर तिने 'कुली नंबर वन', 'बीवी नंबर वन' अशा अनेक गाजलेल्या चित्रपटांमध्ये भूमिका साकारल्या आहेत. १९९१ पासून करिश्माने तिच्या करिअरची सुरुवात केली होती. 'प्रेम कैदी' चित्रपटातून तिने मोठ्या पडद्यावर पदार्पण केलं होतं. आता करिश्माला इंडस्ट्रीमध्ये ३४ वर्षे पूर्ण झाली आहेत. परंतु तुम्हाला माहितीये का अभिनेत्रीने नुकत्याच नेटफ्लिक्सच्या मुलाखतीत तिच्या नावाचा खरा उच्चार नेमका काय आहे याबाबत खुलासा केला आहे. करिश्मा कपूर सध्या 'मर्डर मुबारक' चित्रपटामुळे चर्चेत आहे. यामध्ये तिच्याबरोबर पंकज त्रिपाठी, सारा अली खान, विजय वर्मा प्रमुख भूमिकेत आहेत. मुलाखतीत अभिनेत्रीला तुझ्या नावाचा नेमका उच्चार काय आहे? असा प्रश्न विचारण्यात आला. यावर करिश्माने दिलेल्या उत्तराने सगळेच थक्क झाले."माझं नाव करिश्मा नाही ते करिज्मा (KARISMA) असं आहे." यावर पंकज त्रिपाठींसह उपस्थित सगळ्यांनी आश्चर्य व्यक्त केलं. सारा म्हणाली, "मग तू एवढी वर्षे चुकीचा उच्चार होतोय हे सर्वांना सांगितलं का नाहीस?" यावर करिश्मा म्हणाली, "आता कितीतरी वर्षे मी काम करतेय लोक मला प्रेमाने करिश्मा म्हणत असतील तर काय हरकत आहे? म्हणून मी काहीच बोलत नाही. पण मूळ नाव करिज्मा असंच आहे."करिश्मा कपूरचा खुलासा ऐकून विजय वर्मा म्हणाला, "यापेक्षा लोलो म्हणणं सगळ्यात बेस्ट आहे."

# स्वरा भास्कर निवडणूक लढवणार?

लोकसभा निवडणुकीसाठी काँग्रेसने नुकतीच ५७ उमेदवारांची तिसरी यादी जाहीर केली आहे. यामध्ये महाराष्ट्रातून सात जणांना संधी देण्यात आली आहे. लोकसभेसाठी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेकडून गोविंदाचे नाव चर्चेत आल्यानंतर आता काँग्रेसनेही बॉलीवूड अभिनेत्रीला मैदानात उतरवण्याच्या हालचाली सुरू केल्या आहेत. वृत्तांच्या माहितीनुसार उत्तर मध्य मुंबईतील जागेसाठी आता राज बब्बर यांच्यानंतर अभिनेत्री स्वरा भास्करचं नाव चर्चेत आलं आहे. स्वरा १७ मार्च रोजी झालेल्या राहुल गांधींच्या भारत जोडो न्याय यात्रेत सहभागी झाली होती. तेव्हापासून अभिनेत्री निवडणूक लढवणार असल्याच्या चर्चांनी जोर धरला आहे. उत्तर मध्य मुंबई अत्यंत महत्त्वाचा मतदारसंघ असल्याने याची उमेदवारी कोणाला मिळते याकडे सर्वांचं लक्ष लागून राहिल होतं. अशातच अभिनेत्रीने महाराष्ट्र काँग्रेसचे प्रभारी रमेश चेन्निथला यांची दिल्लीत भेट घेतली. या भेटीनंतर स्वराचं नाव उमेदवारीसाठी आघाडीवर आहे.अभिनेत्री स्वरा भास्कर सोशल मीडियाच्या माध्यमातून अनेकदा सरकारविरोधात तिची बेधडक मतं मांडत असते. याशिवाय अभिनेत्रीने तिच्या एक्स पोस्टद्वारे अनेकवेळा आपली परखड राजकीय मतं मांडली आहेत. २०१९ मध्ये सीएए आणि एनआरसी कायद्यांविरोधात ती मैदानात उतरली होती. तसेच काँग्रेस नेते राहुल गांधी यांच्या भारत जोडो न्याय यात्रेतही तिचा सहभाग होता. आता येत्या दोन दिवसांत स्वराच्या उमेदवारीबाबत अंतिम निर्णय होण्याची शक्यता आहे.

# कंगना रणौतही निवडणुकीच्या रिंगणात



लोकसभा निवडणुकीसाठी भाजपने आपली पाचवी यादी जाहीर केली आहे. उत्तर प्रदेशातल्या १३ लोकसभा मतदारसंघांसह देशभरातल्या १११ लोकसभा मतदारसंघांचे उमेदवार पक्षाने जाहीर केले आहेत. भाजपने मेरठ लोकसभा मतदारसंघातून रामानंद सागर यांच्या रामायण मालिकेतील रामाची भूमिका निभावलेले अरुण गोविल यांना उमेदवारी दिली आहे. तर अभिनेत्री कंगना रणौत हिला हिमाचल प्रदेशमधल्या मंडी लोकसभा मतदारसंघातून लढण्याची संधी दिली आहे. महत्त्वाची बाब म्हणजे पीलीभीत मतदारसंघाचे विद्यमान खासदार वरुण गांधी यांचं तिकीट भाजपने कापलं आहे. भाजपने पाचव्या यादी जाहीर केली असून त्यातून दिग्गजांना नारळ दिल्याचं दिसून येत आहे. वरुण गांधी यांच्याजागी काँग्रेसमधून भाजपमध्ये गेलेले जितीन प्रसाद यांना तिकीट दिलं आहे. तसेच गाझियाबाद मतदारसंघातून दोनवेळा खासदार असलेले व्हीके सिंह यांचं तिकीट कापून अतुल गर्ग यांना दिलं आहे. यादी जाहीर होण्यापूर्वीच जनरल व्हीके सिंह यांनी सोशल मीडियावर निवडणूक न लढवण्याची घोषणा केली होती.पाचव्या लिस्टमध्ये भाजपने हरियाणा येथील चार लोकसभा मतदारसंघांचे उमेदवार जाहीर केले आहेत.उत्तर प्रदेशातील सहारनपूरमधून राघव लखनपाल, मुरादाबादमधून सर्वेश सिंग, मेरठमधून अरुण गोविल, गाझियाबादमधून अतुल गर्ग यांना उमेदवारी दिली आहे. तसेच अलिगढमधून सतीश गौतम, हाथरस (एससी) मतदारसंघातून अनुप वाल्मिकी, बदायूंमधून दुर्विजय सिंह शाक्य, बरेलीमधून छत्रपाल सिंग गंगवार, पीलीभीतमधून जितिन प्रसाद, सुलतानपूरमधून मनेका गांधी, कानपूरमधून रमेश अवस्थी, बाराबंकीमधून राजरानी रावत, बहराइचमधून अरविंद गोंड यांना उमेदवारी देण्यात आली आहे. भाजपकडून लोकसभेसाठी उमेदवारांची पाचवी यादी जाहीर करण्यात आली आहे. यामध्ये बॉलिवूड अभिनेत्री कंगना राणौतला भाजपकडून लोकसभेसाठी उमेदवारी जाहीर करण्याता आली आहे. यासोबत महाराष्ट्रातील तीन उमेदवारांची नावे भाजपने जाहीर केली आहे. भंडारा-गोंदिया मतदारसंघात सुनील मेंढे यांना लोकसभेचं तिकीट देण्यात आलं आहे. त्यासोबतच, गडचिरोली-चिमूर अशोक महादेवराव नेते आणि सोलापूरमधून राम सातपुते यांना भाजपने लोकसभेसाठी उमेदवारी दिली भाजपने लोकसभेसाठी उमेदवारांची पाचवी यादी जाहीर केली आहे. यामध्ये १११ उमेदवारांची नावे जाहीर करण्यात आली आहे..मंडी लोकसभा मतदारसंघातून बॉलिवूड अभिनेत्री कंगना राणौतला भाजपने उमेदवारी दिली आहे. या १११ भाजप उमेदवारांमध्ये तीन उमेदवारी महाराष्ट्रातील आहेत. भाजपची ही महाराष्ट्रातील तिसरी यादी आहे.

# आयपीएल फायनलची तारीख जाहीर!

## आयपीएलचा अंतिम सामना 26 मे रोजी चेन्नईत

नवी दिल्ली ।
। वृत्तसंस्था

**आयपीएल २०२४ ची धुमधडाक्यात सुरुवात झाली आहे. लोकसभा निवडणुकांमुळे आयपीएलच्या पहिल्या टप्प्याचे वेळापत्रक जाहीर करण्यात आले आहे. ७ एप्रिलपर्यंत चालणा-या या टप्प्यात २१ सामन्यांचा समावेश आहे. दुसऱ्या टप्प्याचे वेळापत्रक अद्याप जाहीर झालेले नाही. इंडियन प्रीमियर लीग २०२४ चा अंतिम सामना २६ मे रोजी चेन्नईच्या एमए चिदंबरम स्टेडियमवर खेळवला जाईल.**

अहमदाबाद येथील नरेंद्र मोदी स्टेडियमवर क्वालिफायर आणि एलिमिनेटरचे आयोजन करण्यात येणार असल्याची माहिती मिळाली आहे. बीसीसीआयच्या एका वरिष्ठ अधिकाऱ्याने पीटीआयला सांगितले की, आयपीएल गव्हर्निंग कौन्सिलने गेल्या वर्षीच्या चॅम्पियन चेन्नई सुपर किंग्जच्या घरच्या मैदानावर सुरुवातीचे सामने आणि अंतिम सामने आयोजित करण्याची परंपरा पाळली आहे.मागील हंगामातील चॅम्पियन संघाच्या घरच्या मैदानावर आयपीएल सुरू करण्याची आणि अंतिम सामना आयोजित करण्याची परंपरा आहे. पण कोविडमध्ये या परंपरेचे पालन करता आले नव्हते. पण गेल्या हंगामात (२०२३) आयपीएलच्या सलामीचा आणि अंतिम सामना केवळ विजेत्या संघाच्या घरच्या मैदानावर खेळवला गेला. पीटीआयच्या वृत्तानुसार, बीसीसीआयने लोकसभेच्या निवडणुकीच्या तारखा लक्षात घेऊन उर्वरित आयपीएल सामन्यांचे वेळापत्रक निश्चित केले आहे आणि ते लवकरच जाहीर केले जाईल.सीएसकेचा स्टार खेळाडू महेंद्रसिंग धोनीचा हा शेवटचा आयपीएल हंगाम असू शकतो, असे मानले जात आहे. अशा परिस्थितीत चेन्नईमध्ये अंतिम सामना होणे सीएसकेच्या चाहत्यांसाठी ट्रीटपेक्षा कमी नाही. कारण चेन्नई सुपर किंग्जने यंदाच्या हंगामात अंतिम फेरी गाठली तर चाहत्यांना धोनीला त्याच्या शेवटच्या सामन्यात घरच्या मैदानावर खेळताना पाहता येईल. सीएसकेने आयपीएल २०२४ मध्ये विजयाने सुरुवात केली आहे. संघाने पहिल्या सामन्यात आरसीबीचा ६ गडी राखून पराभव केला आहे.दुसरीकडे,




क्वालिफायर-१ आणि एलिमिनेटर असे दोन सामने अहमदाबादच्या नरेंद्र मोदी स्टेडियमवर, तर दुसरा क्वालिफायर चेन्नईच्या एमए चिदंबरम स्टेडियमवर खेळवला जाण्याची शक्यता आहे.आयपीएल २०२४ देखील मागील (२०२३) हंगामाप्रमाणेच होणार असून त्यात ७४ सामने खेळवले जाणार आहेत. गेल्या वेळी आयपीएल ६० दिवस चालले होते. आयपीएल २०२४ मध्ये, सामना जिंकणाऱ्या संघाला २ गुण दिले जातील, तर हरणाऱ्या संघाला कोणतेही गुण मिळणार नाहीत. सामना अनिर्णित राहिल्यास किंवा निकाल न लागल्यास, दोन्ही संघांना प्रत्येकी १ गुण दिला जाईल. ग्रुप स्टेजनंतर प्लेऑफचे आयोजन केले जाईल. साखळी टप्प्यात तिसऱ्या आणि चौथ्या स्थानावर असलेल्या संघांमध्ये एलिमिनेटर सामना होईल. क्वालिफायर-२ सामना क्वालिफायर-१ मधील पराभूत संघ आणि एलिमिनेटरचा विजेता यांच्यात आयोजित केला जाईल. त्यानंतर क्वालिफायर-१ आणि २ च्या विजेत्यांमध्ये अंतिम सामना आयोजित केला जाईल. बीसीसीआयच्या एका वरिष्ठ अधिकाऱ्याने पीटीआयला सांगितले की, आयपीएल गव्हर्निंग कौन्सिलने गेल्या वर्षीच्या चॅम्पियन चेन्नई सुपर किंग्जच्या घरच्या मैदानावर सुरुवातीचे सामने आणि अंतिम सामने आयोजित करण्याची परंपरा पाळली आहे.मागील हंगामातील चॅम्पियन संघाच्या घरच्या मैदानावर आयपीएल सुरू करण्याची आणि अंतिम सामना आयोजित करण्याची परंपरा आहे. पण कोविडमध्ये या परंपरेचे पालन करता आले नव्हते. पण गेल्या हंगामात (२०२३) आयपीएलच्या सलामीचा आणि अंतिम सामना केवळ विजेत्या संघाच्या घरच्या मैदानावर खेळवला गेला. पीटीआयच्या वृत्तानुसार, बीसीसीआयने लोकसभेच्या निवडणुकीच्या तारखा लक्षात घेऊन उर्वरित आयपीएल सामन्यांचे वेळापत्रक निश्चित केले आहे आणि ते लवकरच जाहीर केले जाईल महेंद्रसिंग धोनीचा हा शेवटचा आयपीएल हंगाम असू शकतो, असे मानले जात आहे. अशा परिस्थितीत चेन्नईमध्ये अंतिम सामना होणे सीएसकेच्या चाहत्यांसाठी ट्रीटपेक्षा कमी नाही. कारण चेन्नई सुपर किंग्जने यंदाच्या हंगामात अंतिम फेरी गाठली तर चाहत्यांना धोनीला त्याच्या शेवटच्या सामन्यात घरच्या मैदानावर खेळताना पाहता येईल. सीएसकेने आयपीएल २०२४ मध्ये विजयाने सुरुवात केली आहे.

### प्लेऑफसाठी संभाव्य ठिकाणे

**» क्वालिफायर १ :**
**नरेंद्र मोदी स्टेडियम, अहमदाबाद**

**» एलिमिनेटर :**
**नरेंद्र मोदी स्टेडियम, अहमदाबाद**

**» क्वालिफायर २ :**
**एमए चिदंबरम स्टेडियम, चेन्नई**

# यंदाही मुंबई इंडियन्सची पहिली मॅच देवालाच

## शुबमनच्या गुजरातने हार्दिकच्या मुंबईला पाजलं पाणी

।नवी दिल्ली ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**गुजरातच्या संघाने अखेरच्या षटकात मुंबई इंडियन्सवर ८ धावांनी शानदार विजय नोंदवला. ६ चेंडूत १९ धावांची मुंबईला गरज असताना उमेश यादवला गोलंदाजी सोपवण्यात आली. पहिल्या चेंडूवर पांड्याने षटकार आणि दुसऱ्या चेंडूवर चौकार लगावला. पण पुढच्या दोन चेंडूवर पांड्या आणि चावलाला बाद केल्याने गुजरात संघाने दणदणीत विजय नोंदवला. या पराभवासह मुंबई इंडियन्सने ११ वर्षांचा रेकॉर्ड कायम ठेवला आहे. मुंबई इंडियन्सने आयपीएल २०१३ पासून आतापर्यंत कधीही पहिला सामना जिंकलेला नाही.**




मुंबई संघाने नाणेफेक जिंकत प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला होता. गुजरातने दिलेल्या १६९ धावांच्या लक्ष्याच्या पाठलाग करताना मुंबईची सुरूवात विकेटने झाली. मुंबईनेही खातेही उघडले नव्हते आणि इशान किशन ओमरजाईच्या गोलंदाजीवर बाद झाला. त्यानंतर आलेल्या नमन धीरने एकाच षटकात १९ धावांची लूट केली पण त्याच षटकात तो बाद झाला. त्यानंतर डेवाल्ड ब्रेविस आणि रोहित शर्मा ने मुंबईचा डाव उचलून धरला आणि त्यांनी संघाची धावसंख्या १०० पार नेऊन पोचवली. रोहितने बाद होण्यापूर्वी २९ चेंडूत ७ चौकार आणि एका षटकाराच्या मदतीने ४३ धावा केल्या. साई किशोरच्या गोलंदाजीवर पायचीत झाल्याने त्याचे अर्धशतक हुकले.तर विस्फोटक फलंदाजी करणाऱ्या डेवाल्ड ब्रेविसचेही अर्धशतक हुकले.

### साई सुदर्शनचे अर्धशतक हुकले

» हार्दिकने १ षटकार आणि १ चौकार लगावत संघाला विजयाच्या जवळ आणले पण बाद झाल्याने विजय मात्र मिळवून देऊ शकला नाही. गुजराजच्या गोलंदाजांनी शानदार गोलंदाजी केली. ओमरजाई, उमेश यादव, स्पेन्सर जॉन्सन आणि मोहित शर्मा यांनी प्रत्येकी दोन विकेट घेत संघाच्या विजयात मोठी भूमिका बजावली. तत्पूर्वी मुंबईच्या संघाने शानदार क्षेत्ररक्षण करत गुजरातच्या धावांवर आपला अंकुश ठेवला. पण मुंबईच्या गोलंदाजीची सुरूवात फारच खराब झाली. बुमराह संघात असतानाही मुंबईचा नवा कर्णधार हार्दिक पांड्याने स्वत: पहिले षटक टाकले आणि त्याची साहाने चांगलीच धुलाई केली. गुजरातकडून गिलने ३१ धावा केल्या तर बुमराहच्या गोलंदाजीवर झेलबाद झाल्याने साई सुदर्शनचे अर्धशतक हुकले.

त्याने ३८ चेंडूत ३ षटकार आणि २ चौकारांच्या मदतीने ४६ धावा करत मोहित शर्माच्या गोलंदाजीवर झेलबाद झाला. रोहित शर्माच्या विकेटनंतर मुंबईच्या धावांची गती मंदावली. गुजरातने भेदक गोलंदाजी करत मुंबईच्या धावांना चांगलाच ब्रेक लावला. तिलक वर्मा (२५), टीम डेव्हिड (११) मोठी धावसंख्या करू शकले नाहीत ज्याचा फटका संघाला बसला.